नियमित दिवाणी दावा क्र.३६/२०१७
CNR MHSO6-0002342017

## निशाणी ५ खालील आदेश

(अंतरिम अर्ज क्र.२–२०१९)

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी वादीस पाठविलेला दिनांक ३०.०५.२०१७ रोजीचा आदेश क्र.गोख/कावि/एसआर/४४/२०१७ च्या आदेशाची अंमलबजावणी करु नये अशी अंतरिम मनाई मिळावी याकरीता केला आहे.

**अर्जातील हकीकत संक्षीप्त स्वरुपात खालीलप्रमाणेः**–

२. शेगांव–दुमाला तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर येथील गट क्र.३५९/अ ही वादीची समाईकात मालकी कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकतीत वादीने नदीच्या पात्रातील वाळु, गौणखनीज कधीही ठेवलेले नव्हते. असे असताना खोटया कार्यवाहीने दिनांक ०६.०५.२०१७ रोजी वादीने असा वाळु साठा केले असल्याची नोटीस प्रतिवादी क्र.२ यांनी पाठवली. त्याप्रमाणे दिनांक ३०.०५.२०१७ रोजी दंड रुपये ०४,१७,८४०/– भरण्यास आदेशित केले. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांनी वादीस पाठवलेला क्र.गोख/कावि/एसआर/४४/२०१७ चा आदेश बेकायदेशीर असल्याचे जाहीर ठराव होऊन मिळण्याकरीता हा दावा वादीने दाखल केला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादींनी त्या नोटीसीस अनुसरुन कार्यवाही केल्यास दावा निष्फळ ठरेल म्हणुन दाव्याच्या निकालापर्यंत उपरोक्त आदेश/नोटीसची अंमलबजावणी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी करु नये अशी अंतरिम मनाई मिळण्याकरीता वादीने हा अर्ज केला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी निशाणी २३ अन्वये या अर्जास लेखी हरकत घेतली आहे. त्यांनी अर्जातील मजकुर नाकारला आहे. दाव्यास कारण घडले नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. दि बॉम्बे रेव्हेन्यु ज्युरिसडिक्शन ॲक्ट १८७६ प्रमाणे या न्यायालयास अधिकार क्षेत्र नाही. तहसिलदार यांनी दिनांक २९.०४.२०१७ च्या अहवालामध्ये वादीने बेकायदेशीर वाळु साठा केलेबाबत पंचनाम्यासह कळविले आहे. वादींनी अनधिकृत वाळु साठा करुन शासनाचा महसुल बुडविलेला आहे. त्याबाबत पंचनाम्यासह कार्यवाही केली आहे. तशी वादीस नोटीस दिलेली आहे. वादी विरुध्द रुपये ०४,१७,८४०/– भरण्याबाबत दंडनिय आदेश

झाला आहे. त्यामुळे पाठविलेली नोटीस व केलेली कारवाई योग्य आहे. झालेला दंड महसुलाची थकबाकी समजून ती वसुल करण्याचा या प्रतिवादींना अधिकार आहे. त्यामुळे अर्ज रदद करावा अशी या प्रतिवादींची विनंती आहे.

४. वादीचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींचा युक्तीवाद नाही. माझे विचारार्थ उदभवलेले मुददे व त्यावरील निष्कर्ष कारणासहित खालीलप्रमाणे आहेत.

| | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सकृत दर्शनी वादीचे दाव्यात तथ्य आहे काय ? | होय |
| २. | न्यायाचे समतोल कोणाच्या बाजुने आहे ? | वादीच्या |
| ३. | कोणाचे अपरिमीत नुकसान होईल ? | वादीचे |
| ४. | काय आदेश ? | अर्ज मंजुर केला आहे. |

## कारणमिमांसा

**मुददा क्र.१ ते ३ करीताः–**

५. उपरोक्त सर्व मुददे एकमेकांशी निगडीत असल्याने ते एकत्रीत विचारार्थ घेतले आहेत. या दाव्यास बॉम्बे रेव्हेन्यु ज्युरिसडिक्शन अॅक्ट १८७६ चे कलम ४ च्या तरतुदींची बाधा येते व त्यामुळे दावा या न्यायालयाच्या अधिकारकक्षेत नाही असा प्रतिवादींचा आक्षेप आहे. गोपीनाथ गणपतराव वि.तहसिलदार, लातुर ए.आय.आर. (बॉम्बे)२००६(६)७०५ या प्रकरणात असे निष्कर्षिले आहे की, Section 11 of the Act of 1876 can not, in our view, be said to create a bar in entertaining the suit relating to an action of the Revenue Officer, where he purports to do an act which is without jurisdiction.

६. सदर निकालपत्राचा विचार करता एखादा महसुल अधिकारी अधिकारकक्षेच्या बाहेर जावुन एखादी कृती करत असल्यास अशा कृतीबाबत दाखल झालेला दावा या न्यायालयाच्या अधिकारकक्षेत येतो. त्यामुळे या दाव्यात तक्रार केलेली कृती महसुली अधिकारक्षेत्राच्या बाहेरची आहे काय हे तपासणे आवश्यक राहील. त्यामुळे या न्यायालयास या दाव्याबाबत अधिकार क्षेत्र आहे.

७. प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.२ यांनी वादीस पाठवलेला क्र. गौख/कावि/एसआर/४४/२०१७ चा आदेश हा या दाव्याचा विषय आहे. मौजे शेगांवदुमाला ता.पंढरपूर, जिल्हा सोलापूर येथील गट क्र.३५९/अ ही वादीची मालकीची असुन वादीने त्याच्या मिळकतीमध्ये कधीही नदीचे पात्रातील वाळु गौण खनिज यांचा साठा केलेला नसतानाही महसुल कर्मचारी यांनी चुकीच्या कागदपत्राच्या आधारे दिनांक ३०.०५.२०१७ रोजी बेकायदेशीर कार्यवाही करण्यात आली असल्याचे वादीचे कथन आहे. वादीने या दाव्यात सदरची कारवाई बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. तसा त्यांनी जाहीर ठराव मागितला आहे. निशाणी ४/२ येथे उपरोक्त आदेशाची प्रत दाखल केली आहे. त्यामध्ये गट क्र.३५९/अ या जमीनीत अनधिकृत वाळुसाठा आढळल्याचा उल्लेख आहे. निशाणी ४/४ येथे प्रतिवादी क्र.२ यांनी वादीस दिलेल्या नोटीसची प्रत दाखल आहे.

८. वादीचा बेकायदेशीर वाळु साठयाशी संबंध येतो किंवा नाही? वादीने वाळु साठा कायदेशीरपणे खरेदी केला होता काय ? हे सर्व प्रश्न या दाव्याच्या चौकशीत निकाली होणार आहेत. परंतु अशी चौकशी होण्यापूर्वीच प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रश्नांकित सुचनापत्रास अनुसरुन अंमलबजावणी केल्यास दावा निष्फळ ठरेल. दाव्यातील वाद प्रश्न निकालापूर्वीच संपुष्टात येईल. त्यामुळे प्रतिवादींनी वादी विरुध्द केलेली सदरची कारवाई योग्य आहे काय ? हे पहाण्याकरीता वादप्रश्न जिवंत ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या निकालापावेतो प्रतिवादी यांनी सदर सुचनापत्रान्वये सदर आदेशाची अंमलबजावणी करु नये अशा आशयाची अंतरिम मनाई देणे योग्य होईल. सबब वादीच्या दाव्यात सकृतदर्शनी तथ्य आहे.

९. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वाद प्रश्न जिवंत ठेवण्याकरीता तसेच एकापेक्षा अनेक दाव्यांची शक्यता टाळण्याकरीता वादी कथन करतात त्याप्रमाणे अंतरिम मनाई देणे शक्य आहे. अशी मनाई न दिल्यास मुळ वाद प्रश्न चौकशी पूर्वीच संपुष्टात येईल. उलट अंतरिम मनाई दिल्यास चौकशी प्रलंबित आहे तोपर्यंत मुळ वाद प्रश्न जिवंत राहील. त्यामुळे न्यायाचा समतोल वादीच्या हितात आहे. याच कारणामुळे अशी अंतरिम मनाई न दिल्यास वादी विरुध्द उपरोक्त सुचनापत्रान्वये आदेशाची कारवाई होऊन त्याचे अपरिमीत नुकसान संभवते.

१०. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वादीस सकृतदर्शनी दाव्यात तथ्य असल्याने अंतरिम मनाई देणे योग्य होईल. सबब मुददा क्र.१ करीता माझा निष्कर्ष सकारात्मक आहे. याच कारणांवरुन न्यायाचा समतोल व अपरिमीत नुकसान भरपाईचा मुददा वादीच्या हितात आहे. सबब, मुददा क्र.२ व ३ करीता माझा निष्कर्ष वादीच्या हितात आहे.

**मुददा क्र.४ करीताः**–

११. उपरोक्त निष्कर्षास अनुसरुन अर्ज मंजुर करणे क्रमप्राप्त आहे. सबब, मी मुददा क्र.४ करीता खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१.अर्ज निशाणी ५ मंजुर केला आहे.

२.प्रतिवादींनी या दाव्याच्या अंतिम निकालापावेतो गौख/कावि/एसआर/४४/२०१७ च्या आदेशाची अंमलबजावणी करु नये अशी अंतरिम मनाई दिली आहे.

३.या अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालावर अवलंबुन राहील.

स्वाक्षरीत/-
(रा.अ.सासने)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
पंढरपूर

दिनांक – १५.०४.२०१९

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. D. Phutane, Stenographer L.G. |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Pandharpur |
| Date | | 15-04-2019 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 15-04-2019 |
| Order uploaded on | : | 15-04-2019 |